# परीक्षा केंद्रावर विशेषत: महिला उमेदवारांसाठी महत्वाची सूचना

उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वतःची ओळख पटविण्यसाठीची आवश्यक ती मूळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे.

उमेदवाराने आपल्या सोबत नवीनतम फोटो चिकटवलेले हे प्रवेशपत्र आणि सदयस्थितीत वैध असे मूळ स्वरुपातील ओळखपत्र आणावे. प्रवेशपत्रावर असणारे नांव (ऑनलाईन नोंदणीच्यावेळी जे उमेदवाराने दिलेले असेल) ओळखपत्रावरील नमूद असलेल्या नावाशी तंतोतंत जुळावयास हवे. विवाहानंतर ज्या महिला उमेदवारांचे पहिले/मधले/अंतिम नांव बदलले आहे त्यांनी हयाची खास दखल घ्यावी. जर प्रवेश पत्रावरील फोटो/नांव आणि ओळखपत्रावरील फोटोत/नांवात कोणताही फरक/विसंगती असेल तर अशा उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही. ज्या उमेदवारांनी आपल्या नांवात बदल केला असेल, अशा उमेदवारांनी **मूळ राजपत्रित अधिसूचना/मूळ विवाह प्रमाणपत्र** प्रस्तुत केले तरच त्यांना परीक्षेस बसण्यास अनुमती देण्यात येईल. **ज्या महिला उमेदवारांच्या नांवात विवाहानंतर बदल झाला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. पॅन कार्ड वरील नांवात बदलास ग्राहय धरले जाणार नाही.** परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नांवात कोणताही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

**रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना ओळखपत्र म्हणून ग्राहय धरला जाणार नाही. उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेचे परीक्षेचे प्रवेशपत्रात दिलेल्या सूचनांची प्रिंट काढावी व काळजीपूर्वक वाचन करावे.**

दिनांक :- 14/06/2024
स्थळ :- सातारा

स्वाक्षरी/-
याशनी नागराजन (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद, सातारा